दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▮ अंक २३६ ▮ मंगळवार १६ जून २०२६ ▮ पाने ४ ▮ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# मैत्रीतून विश्वास संपादन करून सोन्याचा अपहार करणारी टोळी जेरबंद

### सव्वा नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत । तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** लग्नात घालण्यासाठी दागिने हवे आहेत असे खोटे सांगून, मैत्रीच्या नात्याने विश्वास संपादन करत सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करणाऱ्या एका टोळीला जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून पोलिसांनी ९ लाख १५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि मोबाईल जप्त केले आहेत.

अनिता गणेश नजन (रा. बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर) हिने वनिता परसराम नवले आणि अंजुम रफिक तांबोळी यांच्याशी मैत्री केली. लग्नाचे कारण सांगून तिने वनिता नवले यांचे साडेतीन तोळे आणि अंजुम तांबोळी यांचे अडीच तोळे सोन्याचे दागिने मागून घेतले आणि त्यांचा विश्वासघात करून ती फरार झाली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात २४ मे रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा घडल्यानंतर आरोपी मोबाईल आणि विविध सिमकार्डचा खुबीने वापर करून फरार झाले होते. त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागत नव्हता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उप विभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसीचे स.पो. नि. हेमंत थोरात यांनी

▮ पान ४ वर

**पथकात यांचा सहभाग**

सदरची यशस्वी कामगिरी सपोनि हेमंत थोरात, सफौ. राकेश खेडकर, पोहेकॉ देविदास खेडकर, पोकॉ दिपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, अरुण सांगळे, राहुल गुंड आणि महिला पोलीस शिपाई पुनम नरसाळे यांच्या पथकाने केली.

# महिलेच्या विनयभंग प्रकरणी सिद्धार्थनगरमधील तिघे ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महिलेच्या घरासमोर अश्लील कृत्य करून करणा–या दोन आरोपींना तोफखाना पोलिसानी अटक केली आहे. मुख्य आरोपी विनोद मधुकर त्रिभुवन (वय ४३ वर्षे), त्याचा साथीदार हर्ष सुनील शेलार (वय १८ वर्षे) व एक विधीसंघर्षीत बालक (सर्व रा.सिध्दार्थनगर, मुन्सिपल कॉलनी) अशी आरोपींची नावे आहेत.

पीडित महिला हि दिनांक १० जून रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी तिच्या पती व मुलासह घरात झोपलेली असता मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास तिच्या घरासमोरील ओट्यावर काही तरी पडल्याचा आवाज आल्याने पीडितेने पाहिले असता एका कागदी मोरपंखी रंगाच्या बॉक्स पडला होता. महिला व तिच्या घरातील सदस्यानी बॉक्स उघडून

▮ पान ४ वर

# ‘एल–निनो’च्या पार्श्वभूमीवर पाण्याचे काटेकोर नियोजन करा – जिल्हाधिकारी

### । अनधिकृत पाणी उपसा केल्यास वीजपुरवठा खंडित करा
### । पाणीसाठा आरक्षण व कृषी नियोजनाबाबत आढावा बैठक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** एल–निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. शासनाच्या २०१८ च्या निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याचे आरक्षण प्राधान्याने राखून कालवे व बॅकवॉटर क्षेत्रातील अनधिकृत पाणी उपसा तात्काळ थांबवावा. आवश्यकतेनुसार अशा ठिकाणांवरील वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात एल–निनोचा संभाव्य प्रभाव, पाणीसाठा आरक्षण व कृषी विभागाच्या उपाययोजनांबाबत आयोजित तातडीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता सायली पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ. प्रदीप पठारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.विरेंद्र बडदे, नायब तहसीलदार भारती घोरपडे तसेच कृषी, जलसंपदा, महापालिका व महसूल विभागांचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन शेतीसाठी देण्यात येणारे पाणी आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे. जलसंपदा विभागाने पाणीचोरी रोखण्यासाठी तात्काळ भरारी पथके नियुक्त करावीत. कालवे व बॅकवॉटर क्षेत्रात सुरू असलेला अनधिकृत पाणी उपसा त्वरित बंद करावा. आवश्यकतेनुसार संबंधित विद्युत वितरण केंद्रे बंद करून वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

महापालिका, नगरपालिकांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार नागरिकांना दैनंदिन किंवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच जलसंपदा विभागाच्या मुख्य व कार्यकारी अभियंत्यांनी विद्यमान पाणीसाठ्याची स्थिती तपासून पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी सविस्तर नियोजन आराखडा तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

कालव्यांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्यास अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे अधिक

▮ पान ४ वर

### १६८ वेळा रक्तदान करणारे

# अशोक भालके यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार जाहीर

### पुण्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते होणार गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रक्तदान हेच श्रेष्ठ दान मानले जाते. या विचाराला आयुष्यभर कृतीतून जपणारे आणि तब्बल १६८ वेळा रक्तदान करून समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणारे सामाजिक कार्यकर्ते अशोक भालके यांना प्रतिष्ठेचा ‘महाराष्ट्र भूषण २०२६’ पुरस्कार जाहीर झाला आहे.

पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, दि. २० जून रोजी पुणे येथे आयोजित विशेष सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते भालके यांचा गौरव केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी ही माहिती दिली. भालके

▮ पान ४ वर

# स्थानिक गुन्हे शाखेचा पदभार शेवगावचे मुटकुळे यांच्याकडे

### पोलीस अधीक्षक मुम्मका यांचा आदेश । तत्कालीन पोलीस निरीक्षक कबाडी मॅटमध्ये

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांची स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सोमवारी सायंकाळच्या सुमारास तसा आदेश काढला आहे.

आणि गुन्हे शाखेचे तात्कालीन पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांची पोलीस अधीक्षकांनी साई मंदिर सुरक्षा विभाग येथे बदली केलेली आहे मात्र त्या विरोधात किरण कुमार कबडी यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे तथा मॅट मध्ये धाव घेतली आहे पोलीस निरीक्षक किरण कुमार कबडी यांनी आपला बदलीचा आदेश रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

ही सर्व प्रक्रिया पाहता मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला असून या शाखेत नवीन अधिकाऱ्याची नेमणूक कायम होणार किंवा प्रभारी अधिकारीच राहणार याबाबत चर्चा सुरू आहे. पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील १९ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केलेल्या आहे. किरण कुमार कबाडी यांच्या बदलीच्या आदेशानंतर

▮ पान ४ वर

**किरण कुमार कबाडी यांच्या कार्यकाळात पोलीस मुख्यालयातील मुद्देमाल कक्षातून अमली पदार्थाची विक्री झाली. गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्याने परस्पर अमली पदार्थाची विक्री केली. तो कर्मचारी सध्या पोलिसांच्या अटकेत आहे. अमली पदार्थ सुरक्षेची जबाबदारी गुन्हे शाखेचे प्रमुख म्हणून कबाडी यांची होती. याबाबत वरिष्ठानकडून अहवाल मागवण्यात आला होता. पोलीस अधीक्षक यांनी याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठवला असल्याचे समजते.**

# ग्रामसेवकाचा मनमानी कारभार; चार्ज न सोडल्याने ग्रामस्थ आक्रमक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** चनकवाडी व तेलवाडी ग्रुप ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक प्रशांत पाटील यांच्या बदलीचा आदेश १८ जून रोजी काढण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी अद्याप त्यांनी पदाचा चार्ज सोडलेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बदलीचे आदेश झाल्यानंतरही संबंधित ग्रामसेवकांनी कार्यमुक्त होण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. याबाबत पंचायत समिती प्रशासनानेही चार्ज हस्तांतरणाबाबत स्वतंत्र पत्र देत या आठवड्यात आवश्यक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी ग्रामसेवकांवर मनमानी कारभाराचा आरोप करत बदली आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. प्रशासनाने याप्रकरणी ठोस पावले उचलली नाहीत, तर पुन्हा आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

या प्रकरणामुळे चनकवाडी व तेलवाडी परिसरात ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत चर्चा सुरू असून पंचायत समितीच्या पुढील कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# १७ जूनपासून पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस धावणार

### अहिल्यानगर स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते हिरवा झेंडा
### प्रवासी, विद्यार्थी आणि साईभक्तांसाठी महत्त्वाची सुविधा उपलब्ध

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुणे, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारी पुणेसाईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वे सेवा १७ जून पासून सुरू होत आहे. या रेल्वे सेवेचा शुभारंभ पुणे येथे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असून, त्याचवेळी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते रेल्वेला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे.

मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव यांनी याबाबत खासदार नीलेश लंके यांना पत्राद्वारे माहिती दिली असून, मध्य रेल्वेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रणही देण्यात आले आहे.

पुणेसाईनगर शिर्डी या थेट रेल्वे सेवेच्या प्रारंभामुळे पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी दरम्यानची वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. या मार्गावरील प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा पर्याय उपलब्ध होणार असून, दैनंदिन प्रवास करणारे नागरिक, शैक्षणिक कारणांसाठी ये–जा करणारे विद्यार्थी तसेच व्यावसायिक वर्गाला याचा मोठा लाभ मिळणार आहे. विशेषतः साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीकडे जाणाऱ्या भाविकांसाठी ही रेल्वे सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या नव्या रेल्वे सेवेच्या माध्यमातून धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच पुणे, अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील व्यापार, उद्योग, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रेल्वे संपर्क अधिक सक्षम झाल्याने या भागातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला नवे परिमाण प्राप्त होणार असल्याचे मानले जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याला पुण्याशी अधिक प्रभावी रेल्वे संपर्क उपलब्ध व्हावा तसेच धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना जोडणाऱ्या रेल्वे सेवांचा विस्तार व्हावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी संसदेत आणि विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला होता. रेल्वे मंत्रालय, रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वे प्रशासनाकडे त्यांनी वेळोवेळी या मार्गावरील रेल्वे सेवेची आवश्यकता अधोरेखित केली होती.

याशिवाय संसदेतील चर्चांपासून ते रेल्वे समित्यांच्या बैठका, वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतच्या चर्चासत्रे आणि रेल्वेमंत्र्यांना दिलेल्या निवेदनांमधून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नवीन रेल्वे सेवा, प्रवासी सुविधांमध्ये वाढ आणि तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांना प्राधान्य देण्याची मागणी त्यांनी सातत्याने मांडली होती.

या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर पुणेसाईनगर शिर्डी एक्सप्रेसचा प्रारंभ हा अहिल्यानगर जिल्ह्याच्या रेल्वे विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रवाशांची मागणी पूर्ण होत असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, या रेल्वे सेवेचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.



## दै. आकर्षण निवडक

### आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन अहिल्यानगरमध्ये उत्साहात साजरा



अहिल्यानगर- शहरातील श्री रामावतार मानधना चारिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर मध्ये जागतिक मल्लखांब दिवस साजरा करण्यात आला, अहिल्या नगर शहरात गेल्या पंधरा वर्षापासून या सेंटर मार्फत मल्लखांबातील अनेक खेळाडू घडवण्याचे कार्य अविरत सुरू आहे, वय वर्ष पाच पासून ते महाविद्यालयीन तरुण तरुणीसह शेकडो विद्यार्थी रोज या मैदानावर मल्लखांब या आपल्या पारंपारिक खेळाचा सराव करतात, यामध्ये पुरलेला मल्लखांब टांगता मल्लखांब दोरीचा मल्लखांब अशा विविध साधनांवर सराव केला जातो, या प्रसंगी ट्रस्ट चे ट्रस्टी श्री मोहन शेठ मानधना, राष्ट्रीय प्रशिक्षक श्री उमेश झोटिंग सर यांच्या हस्ते मल्लखांबाचे पूजन करण्यात आले, मुलांच्या सुदृढ आयुष्यासाठी दररोज मल्लखांबाचा सराव केला पाहिजे, आज या मैदानामुळे मुले मोबाईल टीव्ही पासून दूर राहतात याचाच सर्व पालकांना आनंद होत आहे, तसेच या देशी खेळांमुळे होणारे फायदे याचे महत्त्व सांगत श्री मोहन शेठ मानधना यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सेंटरचे राष्ट्रीय प्रशिक्षक सौ प्रणिता तरोटे- कवडे , श्री आप्पा लाडाने,श्री अक्षय पावडे सर आदींसह शेकडो विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते,यावेळी मल्लखांबाचे सुंदर असे प्रात्यक्षिक मुलांनी सादर केले.

### जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी ३० जूनपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

अहिल्यानगर- युवकांच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र युवक-युवती तसेच संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव दि. ३० जून २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या युवक अथवा युवतीचे वय संबंधित पुरस्कार वर्षाच्या १ एप्रिल रोजी किमान १३ वर्षे पूर्ण झालेले आणि ३१ मार्च रोजी कमाल ३५ वर्षांपर्यंत असणे आवश्यक आहे.संबंधित अर्जदाराचे जिल्ह्यात सलग पाच वर्षे वास्तव्य असणे बंधनकारक असून, केलेल्या कार्याचे पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे समाजोपयोगी कार्यात सक्रिय राहण्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहणार आहे. एका जिल्ह्यात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचारी हे पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

### नागापूर जिल्हा परिषद शाळेचे चाँद शेख यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर - पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना महाराष्ट्र भूषण २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे दि. २० जून रोजी होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, आशू सुरपूर, संदिप रासकर आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

# जय मल्हार विद्यालयात नवोगत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आज रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ शाळेच्या पहिल्याच दिवशी जय मल्हार विद्यालयात आठवी,नववी,व दहावीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले .विद्यार्थ्यांच्या गळ्यामध्ये पुष्पहार घालून वाजत मिरवणुकीने त्यांना विद्यालयामध्ये आणण्यात आले.विद्यालयामध्ये आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके,दप्तर,आणि वह्या यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर हिने विद्यालयातील विद्यार्थ्यांना १०० दप्तर किट उपलब्ध करून दिले.या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक उत्तम सुंबरे,विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे बी आर,माजी पोलीस अधिकारी बाबाजी जगताप,मा सरपंच नानाभाऊ भांबरे,हभप आकाश महाराज घोलप,जिल्हा परिषदेचे शिक्षक नरवडे,माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर,पंचायत समितीचे अधिकारी बांडे साहेब,ग्रामस्थ राजाराम भांबरे,शिक्षक गर्कळ सर,भगवान भांबरे,गौरी जगताप,संतोष घुले,नारायण पुंडे,पंडित बाई व विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी,पिपळगावरोठा ग्रामस्थ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी पालक बाबासाहेब खोसे यांनी विद्यालयाला वॉटर पुरिफायर हे मशीन देण्याचे जाहीर केले.त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जरांगे सर यांनी केले व आभार केदारी सर यांनी मानले.

# हिवरे कोरड्याचे सुपुत्र अशोक कावरे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारनेर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा गावचे मूळ रहिवासी व सध्या पुणे येथे व्यवसायानिमित्त स्थायिक असलेले अशोक सोनबा कावरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पारनेर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पारनेर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह बबनराव कळमकर यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते अशोक कावरे यांना प्रदान करण्यात आले.

नियुक्तीपत्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा तसेच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्राताई पवार यांच्या पुरोगामी विचारांचा प्रचार-प्रसार करून पक्षाची ध्येयधोरणे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्य करावे व सर्वसामान्य जनतेच्या विकासाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असेही नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे. अशोक कावरे हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल हिवरे कोरडा, पारनेर तालुका तसेच पुणे येथील मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सोलाट वस्ती शाळेत नवागतांचे उत्साहात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोलाट वस्ती (मिरी) येथे इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.

या वेळी नवागत बालकांना सनरूफ असलेल्या चारचाकी वाहनात बसवून विद्यार्थ्यांची आकर्षक मिरवणूक काढून शाळेत प्रवेश केला.गाडीत उभे राहून मुलांनी जल्लोष केला. रंगीबेरंगी फुगे, टोप्या आणि पुष्पगुच्छांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबाचे फूल देऊन त्यांचा शाळेतील पहिला दिवस संस्मरणीय करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा क्षण जपण्यासाठी ''पहिले पाऊल'' या अभिनव उपक्रमांतर्गत पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे कोऱ्या कागदावर घेण्यात आले. हे ठसे पालकांना जपून ठेवण्यासाठी देण्यात आले. आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रवासाची अशी आगळी-वेगळी सुरुवात पाहून पालकही भावूक झाले आणि आनंद व्यक्त केला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेशांचे वितरण करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी मिष्टान्न भोजनाचे आयोजनही करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शाळेसाठी पाच गुंठे जागा बक्षीसपत्राद्वारे उपलब्ध करून देणारे श्री. बद्रीशेठ सोलाट यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

''मिशन आपुलकी'' अंतर्गत लोकसहभागातून शाळेचा कायापालट करण्याचा संकल्प पालकांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन शाळेतील शिक्षक संतोष दुसंगे आणि सुनील पवळे यांनी केले होते.

कार्यक्रमास लक्ष्मण वेताळ, गोरख झाडे, सुदाम पाटोळे, सारिका सोलाट, ज्योती सोलाट, धनेश्वरी झाडे, सुनिता सोलाट, सारंगधर खोसे, प्रशांत सोलाट, पुष्पलता सोलाट यांच्यासह अनेक पालक उपस्थित होते. शाळेच्या या उपक्रमाचे मिरी केंद्राचे केंद्रप्रमुख दगडू महांडुळे, विस्ताराधिकारी निलेश क्षीरसागर आणि गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी विशेष कौतुक केले.

# गावठी कट्ट्यासह युवक जेरबंद; बिडकीन पोलिसांची कारवाई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** अवैधरित्या गावठी कट्टा बाळगून फिरणाऱ्या एका युवकाला छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने बिडकीन येथे अटक केली. या कारवाईत गावठी कट्टा व जिवंत काडतुसे असा सुमारे ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, मुलानी वाडगाव येथून बिडकीनकडे एक युवक गावठी कट्टा घेऊन येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी निलजगाव फाटा ते डीएमआयसी मार्गावरील साई मशिनरी हार्डवेअर अँड इलेक्ट्रिकल परिसरात सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने आपले नाव गणेश शिवाजी उघडे (वय २८, रा. मुलानी वाडगाव, ता. पैठण) असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता कमरेला लपवून ठेवलेला ३० हजार रुपये किमतीचा स्टीलचा गावठी कट्टा आणि ५ हजार रुपये किमतीची पाच जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी बिडकीन पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# संविधानिक संस्थांचा गैरवापर करून भाजपने लोकशाही धोक्यात आणली – कॉ. डॉ. राम बाहेती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाजप आपली केंद्रातील आणि राज्यातील सत्ता कायम राखण्यासाठी सीबीआय, आरबीआय, निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि इतर संविधानिक संस्थांचा गैरवापर करत आहे. त्यामुळे देशाची राज्यघटना आणि लोकशाही धोक्यात आली असल्याची घणाघाती टीका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉ. डॉ. राम बाहेती यांनी केली.

शहरातील बुरुडगाव रोड येथील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात जिल्हा कौन्सिलची सदस्य बैठक पार पडली. कॉ. आप्पासाहेब वाबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत भाकपचे राज्य सचिव कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. संदीप इथापे यांच्यासह ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते श्रीधर अधिक, धोंडीभाऊ सातपुते, प्रताप सहाणे, दशरथ हासे, रघुनाथ पवार, नारायण मेमाले, अर्जुन खैरे, भारत आरगडे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, सुलाबाई आदमाने, ज्ञानदेव गायकवाड,




लक्ष्मण नवले, सुनील दुधाडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे कॉ. डॉ. राम बाहेती म्हणाले की, देशातील विविध राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपच्या जागा कमी झाल्या असल्या तरी मतांची टक्केवारी कमी झालेली नाही. इंडिया आघाडीत काम करताना भाजपविरोधी भूमिका घेतली जात असून, लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी विद्यमान सरकार सत्तेतून जाणे आवश्यक आहे. सत्तेची समीकरणे जुळविताना अनेक राजकीय पक्ष भाजपसोबत गेले, मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्षाने कधीही भाजपसोबत जाण्याची भूमिका घेतलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मतदार यादीच्या पुनर्तपासणीच्या नावाखाली पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९० लाख मतदारांची नावे वगळण्यात आली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोग सरकारच्या दबावाखाली काम करत असल्याचा दावा करत त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप सरकारचे धाडस वाढले असून बहुजन समाजाच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण केले जात असल्याचा आरोप केला.

राजकीय परिस्थितीचा आढावा घेताना त्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा संदर्भ दिला. त्यांना पराभवाचा सामना करावा लागला, त्यांच्या पक्षातील अनेक खासदार आणि आमदार पक्ष सोडून गेले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या संदर्भातील प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्यास विलंब केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीतही अशाच प्रकारच्या घडामोडी झाल्या असून ममता बॅनर्जी यांच्या बाबतीतही तशाच प्रकारची परिस्थिती निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अण्णा हजारे यांच्या हस्ते अवयवदान जनजागृती पुस्तिकेचे प्रकाशन

**समाजातील गैरसमज दूर करण्यासाठी फिनिक्स फाऊंडेशनची जनजागृती मोहीम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजामध्ये अवयवदान, नेत्रदान आणि देहदानाबाबत जागरूकता निर्माण करून त्यासंदर्भातील गैरसमज दूर करण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने अवयवदान जनजागृतीवर आधारित माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राळेगणसिद्धी येथे संपन्न झाले. या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी सकारात्मक विचार निर्माण होण्यास आणि अधिकाधिक नागरिक या चळवळीत सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेतली. यावेळी फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, तुलसीराम पालीवाल, संजय सांवत, माजी सैनिक रामसिंग रायजी, नाना पठारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान फाऊंडेशनच्या माध्यमातून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या नेत्रदान आणि अवयवदान जनजागृती अभियानाची माहिती त्यांना देण्यात आली. तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत अवयवदानाचा संदेश पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेली माहिती पुस्तिकाची माहिती अण्णा हजारे यांना देण्यात आली. फाऊंडेशनच्या वतीने ही पुस्तिका नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यातून अवयवदानाबाबतचे वैज्ञानिक सत्य, कायदेशीर प्रक्रिया आणि सामाजिक महत्त्व यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविली जाणार आहे. समाजातील गरजू रुग्णांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारी ही चळवळ भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस फाऊंडेशनने व्यक्त केला आहे. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी सांगितले की, देशात आणि राज्यात हजारो रुग्ण विविध अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीत आहेत. अनेकांचे जीवन हे योग्य वेळी अवयव उपलब्ध होण्यावर अवलंबून आहे. मात्र, अवयवदानासंदर्भात समाजात अजूनही अनेक गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती प्रचलित असल्याने अपेक्षित प्रमाणात अवयवदान होत नाही. हे गैरसमज दूर करण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशन सातत्याने जनजागृतीचे काम करत आहे. या चळवळीमुळे अनेक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला असून, काहींनी प्रत्यक्ष नेत्रदान करून अंध व्यक्तींना नवदृष्टी देण्याचे महान कार्य केले आहे.

बोरुडे यांनी पुढे सांगितले की, वैद्यकीय विज्ञानाने मोठी प्रगती केली असली तरी मानवी अवयव कृत्रिमरीत्या निर्माण करणे अद्याप शक्य झालेले नाही. त्यामुळे मरणोत्तर अवयवदान हाच गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. यासाठी नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाबाबत व्यापक प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने या विषयाकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहिले, तर अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. अवयवदानामुळे अनेक गरजू व्यक्तींना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे हे केवळ दान नसून समाजासाठी केलेले एक महान पुण्यकर्म असल्याचे त्यांनी नमूद केले. ''अवयवदानाची चळवळ ही समाजाला दिशा आणि प्रेरणा देणारी आहे. आज अनेकजण स्वतःपुरते विचार करतात; मात्र समाजासाठी काहीतरी करण्याची भावना जोपासली पाहिजे. जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून जनतेच्या सेवेसाठी सुरू केलेले हे कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी अनेकांना नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी देण्याचे कार्य केले आहे,''


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन केला ‘प्रवेश महोत्सव’




अहिल्यानगर - दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या रिमांड होम केंद्रांतर्गत एका विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेद्वारे केंद्र स्तर शिक्षकांनी व मार्कंडेय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक यांनी थेट विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून प्रवेश महोत्सव साजरा केला, तसेच शाळेत नवीन प्रवेश देखील निश्चित केले. रिमांड होम केंद्रातील केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे, रामेश्वर ढगे, मार्कंडेय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, निलेश आनंदास यांनी एका दिव्यांग विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्याचे पुष्पगुच्छ देऊन अत्यंत उत्साहात स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली. केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी या मुलाशी आपुलकीने संवाद साधला. तसेच पालकांशी चर्चा करताना त्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन केले व शासनाकडून मिळणाऱ्या विविध सोयी-सुविधांची सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापक संदीप छिंदम यांनी पालकांना आपल्या पाल्याला नियमित शाळेत पाठवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले. रिमांड होम केंद्रातील दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे आणि रामेश्वर ढगे यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांतून काही दिव्यांग विद्यार्थ्यांचे ‘शारदा विद्या मंदिर’ मध्ये यशस्वीरित्या प्रवेश करण्यात आले. शाळेत प्रवेशावेळी मुख्याध्यापिका भक्ती पुराणिक यांनी या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले.

### फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब ठरला अहिल्यानगर प्रीमियरचा चॅम्पियन

अहिल्यानगर - अशोकभाऊ फिरोदिया स्कूल मैदानावर झालेल्या अहिल्यानगर प्रीमियर फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब संघाने सुमन फुटबॉल क्लबचा २-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.सामन्याच्या सुरुवातीलाच फिरोदिया शिवाजियन्सने आक्रमक खेळ करत आघाडी घेतली. अभय साळवे आणि मयूर गोरखा यांनी प्रत्येकी १ गोल करत संघाला २-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सुमन एफसीच्या अविनाश शिंदे याने १ गोल करून फरक कमी केला, मात्र फिरोदिया शिवाजियन्सने आघाडी कायम राखत २-१ असा विजय मिळवला. नमोह एफसी आयोजित या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व ४ सामने जिंकत अजिंक्य राहून विजेतेपद संपादन केले. संघाच्या शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळामुळे त्यांना या यशावर शिक्कामोर्तब करता आले. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार फिरोदिया शिवाजियन्सच्या मयूर गोरखा व रोशन रिकामे यांना प्रदान करण्यात आला. बाटा एफसीच्या कामरान रंगरेज याने सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा पुरस्कार पटकावला, तर सुमन एफसीच्या ओंकार डोंगरे याला उत्कृष्ट गोलरक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय सहभागी प्रत्येक संघातील एका उत्कृष्ट खेळाडूचाही सत्कार करण्यात आला.

### छाया शिंदे यांचे निधन



अहिल्यानगर - शहरातील कल्याण महामार्गावरील शिवाजीनगर परिसरातील रहिवासी व जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ परिचारिका छाया कैलास शिंदे (वय ४३) त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, सासू, मुली कादंबरी व काव्यांजली असा परिवार आहे. जिल्हा शासकीय रूग्णालयातील न्याय वैद्यकीय प्रकरण (एमएलसी) विभाग प्रमुख कैलास काशिनाथ शिंदे यांच्या त्या पत्नी होत.

## शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन- सिताराम खिलारी

**ढोकेश्वर विद्यालयात पुस्तके, गुलाबपुष्प वाटप करत नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** शिक्षण व्यवस्था ही सामाजिक व्यवस्था आहे. ती कोणाच्याही मालकीची नाही. समाजाचा जितका सहभाग वाढेल तितकी समाजाला ही शिक्षण व्यवस्था आपली वाटू लागेल. शाळेत विद्यार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन होत असते म्हणून शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे असे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे विश्वस्त सन्मा. सिताराम खिलारी पाटील यांनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ कार्यक्रम प्रसंगी सिताराम खिलारी उर्फ आण्णा बोलत होते.

या प्रसंगी इयत्ता ५ वी ला तसेच इतर वर्गात नव्याने आलेल्या विदयार्थ्यांचे गुलाबपुष्प, मोफत पुस्तके आणि बिस्कीट वाटप करून उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या आवारात पद्मभूषण आण्णासाहेब हजारे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वि. का सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे साहेब माजी चेअरमन बबनराव पायमोडे, ग्रामपंचायत सदस्य दत्ताशेठ निवडुंगे, बापूसाहेब रांधवन, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, समन्वयक अशोक गांगड शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहू जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, कैलास नऱ्हे, अर्जुन ठाणगे, राजू पठाण, शेखर गायकवाड, सुनील पायमोडे, संभाजी मेहेर, सुनील ठुबे, अर्जुन रोकडे, जगन्नाथ रोकडे, सुभाष वाळुंज, अमोल शिंदे, नितीन खोडदे, अर्जुन वाळुंज, कविता शिंदे, रेखा अडसूळ, सोनाली रोकडे, वर्षा मेहेर, अरिफा शेख, सुवर्णा दुधावडे मनीषा भोजने कल्याणी नऱ्हे, भाग्यश्री खोडदे, यांसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रवींद्र मते, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, भाऊसाहेब हिंगडे, राजेंद्र ढोणे, पोपट जगदाळे , अशोक वाघ, आतिष झावरे, संदीप खिलारी, नारायण शेळके, निलेश जासूद, नितीन ढोकळे, श्रीरंग धामणे, संदीप महाडूळे, विष्णू भद्रे, निलम खिलारी, वैशाली गायके, सोनल रोहोकले, सुरेखा ठाणगे, कल्पना जाधव, सुमन वाळुंज , प्रिया डवणे, वर्षा भोंडवे, पवन कुटे अनुष्का कांबळे इत्यादी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल रोहकले यांनी केले तर आभार रविंद्र मते यांनी मानले

## ढोल–ताशांच्या गजरात डोके विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षणाचा लाभ घ्यावा – आशादेवी डोके**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी डोके विद्यामंदिर व साई विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, पुष्पगुच्छ देऊन आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेचा परिसर फुलांच्या सजावटीने नटला होता. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा उत्साह आणि शिक्षकांची आत्मीयता यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा आशादेवी डोके या होत्या. प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पुष्पगुच्छ प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल–ताशांच्या निनादात विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.

अध्यक्षीय भाषणात आशादेवी डोके म्हणाल्या, ‘‘विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे पवित्र कार्य शाळा करीत असते. प्रत्येक विद्यार्थ्याने नियमित शाळेत उपस्थित राहून मन लावून अभ्यास करावा. शिस्त, परिश्रम आणि सातत्य यांच्या बळावरच यश मिळते. शाळेतील विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधावा.‘‘ त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे यांनी शाळेतील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. पालकांनी शाळेवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, ‘‘यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो. दररोजचा नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थी कोणतेही ध्येय साध्य करू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अपार क्षमता असून ती ओळखून तिचा विकास करणे आवश्यक आहे.‘‘

यावेळी पालक प्रतिनिधी श्रीकांत सर्जेराव आंधळे यांनी विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप करून त्यांचे स्वागत केले. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये यामुळे विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया वाळके यांनी प्रभावीपणे केले. अध्यक्षीय सूचना आशा धामणे यांनी दिल्या, तर आभार प्रदर्शन राणी राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंजू नवगिरे, संजोग बर्वे, अभिषेक खामकर आणि सुजाता कर्डीले यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन ज्योती पवार यांनी केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा स्वागत समारंभ संस्मरणीय ठरला. नवागत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात सकारात्मक वातावरणात झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## लोकहिताचे काम करणारे कार्यकर्ते हिच खरी पक्षाची ताकद

**आमदार काशिनाथ दातेंकडून कवाद दाम्पत्याचे कौतुक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** निघोज ता. पारनेर येथे कवाद दाम्पत्याच्या विशेष प्रयत्नांतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड वाटप पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांचे शुभहस्ते झाले. समाजातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य घटकांच्या हितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सौ. सुधामती विठ्ठल कवाद आणि विठ्ठल कवाद यांचे जनकल्याणकारी व लोकाभिमुख उपक्रम राबविल्याबद्दल विशेष अभिनंदन केले. समाजातील गरजू घटकांपर्यंत विविध सुविधा पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, लोकहिताचा विचार करून कार्य करणारे कार्यकर्ते हे पक्षाची खरी ताकद आहे.

‘‘राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे उपक्रम समाजाला नवी दिशा देतात. सुधामती कवाद आणि विठ्ठल कवाद यांनी राबविलेला हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असून अशा कार्यामुळे समाजात विश्वास आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ होते.‘‘ या कार्यक्रमात शेकडो महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आपल्या गावातच सबंधित स्मार्ट कार्डची सुविधा उपलब्ध झाल्याने उपस्थित नागरिकांमध्ये वेळ व मनस्तापातून मुक्तता मिळाल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आयोजकांच्या कार्याचे निघोजसह परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

यावेळी राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे सर, ॅड. युवराज पाटील, ज्ञानूशेठ लंके, विठ्ठलराव कवाद, सुधामती कवाद, रोहिदास लामखडे, बाळासाहेब लामखडे, रमेश वरखडे, हिराभाऊ सोनवणे, पै. सुभाष वराळ, शरद ठुबे, यश शेटे, पृथ्वीराज कवाद, भास्करअण्णा उचाळे, संदीप कवाद, शांताराम कवाद, सोमनाथ वरखडे साहेब, विशाल साळवे, स्वराज कवाद आदी मान्यवरांसह महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **‘आमदार दाते सरांची जनतेशी असलेली बांधिलकी, विकासकामांची तळमळ आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता ही आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीतूनच प्रेरणा घेत आम्ही हा स्मार्ट कार्ड वाटपाचा जनकल्याणकारी उपक्रम राबविला आहे. दाते सर नेहमीच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न करतात, हीच त्यांची खरी ताकद आहे. जनतेच्या सेवेला प्राधान्य देणारे त्यांचे नेतृत्व आज पारनेर तालुक्यात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अशाच लोकहिताच्या उपक्रमांद्वारे समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा आमचा प्रयत्न राहील.’**
>
> **सौ. सुधामती विठ्ठल कवाद,**
> **जिल्हा कार्याध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.**

## ‘अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन’च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मेळावा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने सक्कर चौक येथील हॉटेल यश पॅलेसमध्ये आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व भव्य करिअर मार्गदर्शन मेळावा २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या निमित्ताने फाउंडेशनच्या वतीने बाबावाडी येथील निराधार मुलांना खाऊ वाटप करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले.

मेळाव्यात मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थी व पालकांना उच्च शिक्षण, , , , वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच विविध रोजगार व करिअर संधींबाबत तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास नगरसेवक योगीराज गाढे व नगरसेवक नवनाथ कातोरे यांनी विशेष उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात मोठी उद्दिष्टे ठेवून यश संपादन करण्याचे आवाहन केले. तसेच अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

मुख्य मार्गदर्शक म्हणून डॉ. धनंजय वारे, डॉ. दादासाहेब करंजुले, इंजि. डॉ. विजयकुमार ठुबे, प्रा. अमोल सायंबर आणि प्रा. अतुल सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, स्पर्धा परीक्षांची तयारी, वेळेचे व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्त्व विकास याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक गाढे, मनोज सोनवणे, संदीप नवसुपे, सिद्धांत पानसरे, शशिकांत भांबरे, भरत सुंबे, सागर भोसले, जगन्नाथ निमसे, मिलिंद जपे, मयूर पवार, वैभव भोगाडे परमेश्वर पाटील, विलास तळेकर, अनुराधा येवले, बालाजी काळे, रत्नाकर दरेकर, सुधीर दुसंगे, राजाभाऊ शिर्के, गणेश सागर, अनंत देठे, अशोक कुटे, रोहिणी वाघमारे, मोहिनी सोनवणे, दारकुंडे सर, श्रीपाद दगडे, अक्षय तोडमल, संजय शिंदे, दत्ता वाबळे, मित गाढे व तेजस सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवजल पाईपचे राम जरांगे, साई मुरली लॉन्सचे जगन्नाथ निमसे, यश पॅलेस हॉटेलचे योगीराज गाडे, जेआरपी ग्रुपचे जगदीश पिंपळे साहेब, दैनिक जनता आवाजचे अजितजी मोरे तसेच आरोग्यसदन हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अधिक प्रभावीपणे पार पडले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, मार्गदर्शक, पालक, विद्यार्थी, सहकारी व सर्व हितचिंतकांचे अखंड मराठा फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

## पेढे तुला करून आमदार अक्षय कर्डिले यांचा सत्कार; आगडगावच्या विकासाला मिळणार नवी गती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय मिळवून विधानसभा गाठलेल्या नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा सन्मान करण्यासाठी श्री क्षेत्र काळ भैरवनाथ मंदिर ट्रस्ट आणि अक्षयदादा कर्डिले प्रतिष्ठान यांच्या वतीने आगळावेगळा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी आमदार अक्षय कर्डिले यांची पारंपरिक पद्धतीने पेढे तुला करून भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला नागरिक, भाविक आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

यावेळी स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त तसेच अधिक मासाच्या औचित्याने धोंड्याचे अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कन्या सुवर्णा संदीप कोतकर यांच्या वतीने राबविण्यात आला. धार्मिक, सामाजिक आणि विकासात्मक संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, ‘‘राहुरी विधानसभा मतदारसंघातील जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो विश्वास सार्थ ठरविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. पोटनिवडणुकीच्या काळात मी मतदारांना आणि आगडगाव परिसरातील नागरिकांना विकासाची जी आश्वासने दिली होती, ती केवळ निवडणुकीपुरती नव्हती. ती माझी बांधिलकी होती आणि त्या प्रत्येक शब्दाची पूर्तता करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

ते पुढे म्हणाले की, ‘‘स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले साहेबांनी या भागाच्या विकासासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी दिलेला शब्द आणि निर्माण केलेला विश्वास हीच माझी प्रेरणा आहे. साहेबांनी ज्या विकासदृष्टीने काम केले, त्याच विचारांचा वारसा पुढे नेत मी मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. आगडगाव परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, धार्मिक स्थळांचा विकास आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील.

आमदार कर्डिले म्हणाले की, ‘‘येत्या काही दिवसांत आगडगाव परिसरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांना सुरुवात होणार आहे. विशेषतः बुऱ्हानगर ते आगडगाव हा मार्ग अधिक रुंद, मजबूत आणि दर्जेदार करण्यात येणार आहे. या रस्त्याचा फायदा केवळ स्थानिक नागरिकांनाच नाही तर श्री क्षेत्र काळ भैरवनाथ मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांनाही होणार आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांना आणि भाविकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. आता ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे.

## सोमवती अमावस्येनिमित्त ढोकेश्वर लेणीत भाविकांची प्रचंड गर्दी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर–** सोमवती अमावस्येच्या पावन पर्वानिमित्त पारनेर तालुक्यातील प्राचीन व ऐतिहासिक ढोकेश्वर लेणी मंदिर परिसरात भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ म्हणून ओळख असलेल्या ढोकेश्वर लेणी येथे पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. पांडवकालीन म्हणून प्रसिद्ध असलेल्या या प्राचीन लेणीत भगवान शंकराचे स्वयंभू मंदिर असून सोमवती अमावस्येनिमित्त दर्शन घेण्यासाठी जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून भाविक दाखल झाले होते. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी अभिषेक, पूजा–अर्चा व धार्मिक विधी करून कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. लेणी परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि धार्मिक महत्त्व यामुळे भाविकांसह पर्यटकांनीही मोठी गर्दी केली. मंदिर प्रशासन व स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सोमवती अमावस्येच्या निमित्ताने ढोकेश्वर लेणी परिसर भक्तांनी फुलून गेला असून दिवसभर दर्शनासाठी भाविकांची मोठी वर्दळ कायम होती.

# शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे साधन – आ. काशिनाथ दाते सर

## पळशी आश्रमशाळेत शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील पळशी येथिल शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सव व नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांचे उपस्थितीत झाला.

यावेळी नवागतांसह सर्वच विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. नव्या स्वप्नांसह शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील अपेक्षा यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी आमदार दाते सर म्हणाले की, ''शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक आणि देशाचा कर्तृत्ववान शिल्पकार असतो. त्यामुळे शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि मूल्यांची जोपासना करणे तितकेच महत्त्वाचे आहे.'' पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ती पूर्ण करण्याचा संदेश दिला. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा आणि सामाजिक जाणीवा निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी युवती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अंबादास बागुल सर, विस्तार अधिकारी विनित लाळगे, मुख्याध्यापक हिंगडे सर, मृणाल ओव्हाळ, शाळा समिती सदस्य लहुजी मधे, सरपंच प्रकाश राठोड, गणेश हाके, गणेश शिंदे, संपत जाधव, सुभाष गांधी, नंदुशेठ शिंदे, सखाराम नवले, अमोल रोकडे, उमाजी मधे, काकासाहेब वारे, उपसरपंच नवनाभ आगिवले, संदीप गायकवाड यांच्यासह शिक्षकवृंद, स्थानिक पदाधिकारी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश देणारा हा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास अशा उपक्रमांची मोठी मदत होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# श्री नाथ विद्या मंदिरात प्रवेशोत्सव उत्साहात

## नवीन विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत ; शिक्षणासोबत संस्कारांची जोपासना करण्याचा निर्धार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री नाथ विद्या मंदिर व डॉ.पाऊलबुधे माध्यमिक शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या प्रारंभानिमित्त आयोजित करण्यात आलेला ''प्रवेशोत्सव'' मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात संपन्न झाला. शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टाळ्यांचा कडकडाट व मंगलमय स्वागतगीतांच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि पालकांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले. यानंतर शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत शिक्षणाच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. प्रवेशोत्सवानिमित्त संपूर्ण शाळा आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी फलक व स्वागत कमानींनी सजविण्यात आली होती. विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक उपक्रम, खेळ, सांस्कृतिक सादरीकरणे तसेच प्रेरणादायी मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सहसरचिटणीस रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्री.बुचकुल यांनी सांगितले की,''शिक्षण हे केवळ गुण मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यामुळे शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि परिश्रम या मूल्यांची जोपासना करत ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे. श्री.देशमुख म्हणाले की शाळेतील प्रत्येक दिवस हा नवीन शिकण्याची संधी म्हणून स्वीकारल्यास यश नक्की मिळते.''

श्री.भोईटे यांनी सांगितले की, ''श्री नाथ विद्या मंदिर हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य सातत्याने करत आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जोपासून आत्मविश्वासाने शिक्षण घ्यावे व पालकांनीही मुलांच्या प्रगतीसाठी शाळेला सहकार्य करावे.''असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माध्यमिकच्या प्राचार्य विजया नवले, श्री नाथ मंदिर च्या मुख्याध्यापिका संगीता सब्बन यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत घर आणि शाळा यांच्यातील सुसंवादामुळे विद्यार्थ्यांचा विकास अधिक प्रभावीपणे होतो.असे मत व्यक्त करण्यात आले. उपस्थित पालकांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.

प्रवेशोत्सवामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नवीन विद्यार्थ्यांनीही शाळेच्या वातावरणाशी सहजपणे जुळवून घेत शिक्षणाच्या नव्या पर्वाला उत्साहाने सुरुवात केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांचे विशेष सहकार्य लाभले.

शेवटी सर्व नवीन विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. ''तमसो मा ज्योतिर्गमय'' या ब्रीदवाक्याप्रमाणे विद्यार्थ्यांना ज्ञानाचा प्रकाश देण्याचा संकल्प व्यक्त करत प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# विखे यांच्या जन्मदिवसानिमित्त कोळसांगवीत शालेय साहीत्य वाटप



(छाया– सतिष जगताप )

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** दैनिक आकर्षण: पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळसांगवी येथे महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जन्म दिवसा निमित्त विद्यार्थांना शालेय साहीत्य वाटप करुण जन्म दिवस साजरा करण्यात आला साहेबांनी केलेल्या अव्हानानुसार माझे पोस्टर किंवा हार गुच्छ न देता शालेय विद्यार्थ्यांना किंवा गरजू लोकांना मदत करा आशे आवाहन केले होते.

यांच्या जन्मदिवसानिमित्त युवराज फुंदे लोकनियुक्त सरपंच कोळसांगवी तथा भाजपा तालुका उपाध्यक्ष पाथर्डी मित्रपरिवार यांच्या माध्यमातून मौजे कोळसांगवी ता पाथर्डी जि अहिल्यानगर येथील जि प प्रा शाळा कोळसांगवी व विजयनगर तसेच अंगणवाडी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच दगडू नाना धनवडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र फुंदे सर गणेश धनवडे ग्रामसेविका सांगळे मॅडम गुलाब बापू घुले संभा घुले आदेश साळवे बलभीम साळवे रवी गाडे आकाश भागवत बबन कुसळकर राजू कुसळकर साहेबराव कुसळकर काटकर सर विजयनगरचे मुख्याध्यापक बांगर सर घुले मॅडम सुलभा काकी घुले ग्रामपंचायत कर्मचारी रामदास साळवे आदी ग्रामस्थ पालक विद्यार्थी उपस्थित होते .

# शाळा प्रवेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पैठण पोलिसांकडून विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत; 'डायल ११२' आणि सायबर सुरक्षेचे धडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** महाराष्ट्र शासनाच्या 'शाळा प्रवेशोत्सव २०२६' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आज, दिनांक १५ जून २०२६ रोजी पैठण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध शाळांमध्ये पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत केले. पहिल्याच दिवशी पोलिसांना आपल्यामध्ये पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि कुतूहल पाहायला मिळाले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळेत पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्वागत पोलिसांच्या वतीने गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणाबाबत सकारात्मक आणि आनंदाचे वातावरण निर्माण करणे, तसेच त्यांच्या मनातील पोलिसांबद्दलची भीती दूर करून मैत्रीपूर्ण नाते तयार करणे हा होता.



**विद्यार्थ्यांना दिले सुरक्षेचे आणि कायद्याचे धडे**

याप्रसंगी उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केवळ विद्यार्थ्यांचे स्वागतच केले नाही, तर त्यांना रोजच्या जीवनात अत्यंत उपयुक्त ठरणारी महत्त्वपूर्ण माहिती अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितली: डायल ११२ ( ११२): कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत किंवा संकटाच्या वेळी तात्काळ पोलिसांची मदत मिळवण्यासाठी डायल ११२ या सुविधेचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले.

वाहतूक नियम: रस्त्यावरून चालताना, रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. सायबर सुरक्षितता आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करताना कोणती खबरदारी घ्यावी, अनोळखी लिंक्स किंवा मेसेजला बळी पडू नये, याबाबत शाळकरी मुलांना जागरूक करण्यात आले. कायद्याचे पालन: देशाचा एक सुजाण नागरिक म्हणून लहानपणापासूनच कायद्याचे पालन करण्याची सवय कशी असावी, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. वरील कार्यक्रम पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील ,पोलीस निरीक्षक पैठण महादेव गोमारे, आणि पोलीस ठाणे पैठण येथील अधिकारी व अंमलदार यांनी वरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला

# अल्पना पावभाजी' व्यावसायिकावर जीवघेणा हल्ला; भरदिवसा भाईगिरीचा थरार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील वाढत्या गुन्हेगारीने पुन्हा एकदा डोके वर काढले असून भरदिवसा एका छोट्या व्यावसायिकावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. नगर–रेल्वेस्टेशन रोडवरील उज्वल कॉम्प्लेक्स परिसरात प्रसिद्ध 'अल्पना पावभाजी' हातगाडी चालक व त्यांच्या भावावर झालेल्या हल्ल्याने कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, समर्थ नगर येथील रहिवासी अलीम जाफर शेख हे आपल्या भाऊ अनिस शेख यांच्यासह उज्वल कॉम्प्लेक्ससमोर 'अल्पना पावभाजी व बिर्याणी सेंटर' या नावाने हातगाडी व्यवसाय करतात. १४ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एका व्यक्तीने उज्वल कॉम्प्लेक्सच्या मागील बाजूस पुलावचे पार्सल पोहोचवून देण्याची मागणी केली. मात्र व्यवसाय सुरू असल्याने हातगाडी सोडून जाणे शक्य नसल्याचे सांगत अलीम शेख यांनी नम्रपणे नकार दिला. मात्र या किरकोळ कारणाचा राग मनात धरून संबंधित व्यक्ती काही साथीदारांसह पुन्हा हातगाडीवर परतल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत दहशतीचे वातावरण निर्माण केले आणि अलीम शेख व अनिस शेख यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. लोखंडी तव्याने डोक्यात वार हल्लेखोरांची दादागिरी एवढ्यावरच थांबली नाही. पावभाजी बनवण्यासाठी वापरण्यात येणारा गरम लोखंडी तवा उचलून एका आरोपीने अनिस शेख यांच्या डोक्यात जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात अनिस शेख गंभीर जखमी झाले. रक्तबंबाळ अवस्थेत ते कोसळल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेनंतर जखमींना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून अनिस शेख यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**कोतवालीत गुन्हा दाखल**

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५१(२) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**छोट्या व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण**

भरदिवसा, शहराच्या मध्यवर्ती भागात आणि गर्दीच्या ठिकाणी एका व्यावसायिकावर अशा प्रकारे हल्ला होत असेल तर सामान्य नागरिक आणि छोटे व्यावसायिक कितपत सुरक्षित आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या भाईगिरीमुळे शहरातील फेरीवाले, हातगाडी चालक आणि लघु व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**अहिल्यानगरचा बिहार होत आहे का?''**

शहरात वाढती गुन्हेगारी, खुलेआम मारामाऱ्या, व्यावसायिकांना धमक्या, खंडणीखोरीच्या चर्चा आणि वाढती दादागिरी यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. एका साध्या पार्सलच्या कारणावरून थेट लोखंडी तव्याने हल्ला करण्यापर्यंत मजल जाणे हे कायदा–सुव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अहिल्यानगरचा बिहार होत आहे का?'' असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. शहरात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. भरदिवसा व्यावसायिकांवर जीवघेणे हल्ले होत असताना गुन्हेगारी प्रवृत्तींना वेळीच लगाम घालण्यासाठी पोलिसांनी धडक मोहीम राबवून कठोर कारवाई करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा उद्या कोणत्या निष्पाप व्यावसायिकावर अशाच प्रकारे हल्ला होईल, याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

(पान १ वरून)

## मैत्रीतून विश्वास संपादन करून सोन्याचा अपहार करणारी टोळी जेरबंद

तपास पथक स्थापन केले. तपास पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माग काढत चार आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये अनिता गणेश नजन (वय ४०), वैष्णवी गणेश नजन (वय २२), गणेश परसराम नजन (वय ४८, तिघे रा. बोल्हेगाव फाटा) आणि त्यांचा साथीदार बन्यामीन योसेफ बोरुडे (वय २६, रा. कर्जुने खारे) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेले ७५ हजार रुपये किमतीचे ५ मोबाईल व सिमकार्ड असा एकूण ९ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शैलेश अरुण रोहोकले करत आहेत.

## 'एल–निनो'च्या पार्श्वभूमीवर पाण्याचे काटेकोर नियोजन करा – जिल्हाधिकारी

किफायतशीर व पाणी बचतीचे ठरत असेल, तर त्या पर्यायाची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर तपासणी करावी, असे निर्देशही श्री.आशिया यांनी बैठकीत दिले. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय व समाधानकारक पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे. उतारावर आडवी पेरणी करण्याबाबत जनजागृती करावी. जिल्ह्यात खते व बियाण्यांची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र खतांचा काळाबाजार, लिंकिंग तर होत नाही ना याची कृषी विभागाने भरारी पथकांच्या माध्यमातून तपासणी करावी. खत व बियाणे पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी आणि डिजिटल पीक पाहणी मोहीम तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या. जिल्ह्यात सुरू असलेली जलसंधारणाची कामे, गाळ काढण्याची कामे व इतर पाणी साठवण क्षमतेत वाढ करणारी कामे जलद गतीने पूर्ण करावीत, जेणेकरून उपलब्ध पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा निर्माण करता येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी सांगितले.

## महिलेच्या विनयभंग प्रकरणी सिद्धार्थनगरमधील तिघे ताब्यात

पाहिला असता त्यामध्ये एक कृत्रिम मानवी लिंग आढळून आले. या प्रकरणी तोफखाना पोलिसांत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७९, ३(५) प्रमाणे दिनांक १३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी गुन्ह्यातील मुख्य आरोपी विनोद मधुकर त्रिभुवन याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हर्ष सुनील शेलार व एका अल्पवयीन मुलाचे नाव सांगितले. पुढील तपास सफौ गोपीनाथ गोर्डे करत आहेत.

## अशोक भालके यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर

यांच्या दीर्घकालीन समाजसेवेची आणि रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पुरस्कार निवड समितीने त्यांची निवड केली. मूळचे चांदा (ता. नेवासा) येथील रहिवासी असलेले अशोक भालके हे जिल्हा परिषद आरोग्य विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत. शासकीय सेवेत कार्यरत असतानाच त्यांनी समाजसेवेचा वसा जपला. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर मदत मिळावी, रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर व्हावेत आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

भालके यांनी केवळ स्वतः रक्तदान करण्यापुरते कार्य मर्यादित न ठेवता विविध गावांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, जनजागृती कार्यक्रम तसेच मार्गदर्शन उपक्रम राबविले. पुणे येथे होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, आशू सुरपूर, संदीप रासकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात समाजसेवा, शिक्षण, कला, साहित्य आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र भूषण २०२६' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल भालके यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेचा पदभार शेवगावचे मुटकुळे यांच्याकडे

पोलीस अधीक्षक यांनी मॅट मध्ये कॅव्हेट दाखल केले होते. प्रशासनाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय कोणताही निर्णय देऊ नये अशी मागणी पोलीस अधीक्षकांनी मॅटद्वारे केली आहे. याबाबतची नोटीस कबाडी यांना सोमवारी प्राप्त झालेली आहे.

किरण कुमार कबाडी यांनी बदलीच्या आदेशाला ॲड. विश्वास वाघ यांच्यामार्फत आव्हान दिले आहे. पोलीस निरीक्षक कबाडी यांची २३ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षक पदी नियुक्ती झाली होती. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षाचा होता. फक्त १० महिन्यातच त्यांची बदली शिर्डी सुरक्षा विभागात करण्यात आली आहे.